REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 5 | FEBRUARY – 2017

# लोकसभा निवडणुकीतील काँग्रेस पक्षाची कामगिरी

**डॉ. सुशील शिंदे**
सहा.प्राध्यापक,
क.भा.पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

**गोषवारा :**

स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय काँग्रेस हा प्रदीर्घ काळ भारतीय राजकारणातील एक प्रभावी पक्ष म्हणून उदयास आला. १९५२ ते १९६७ या काळ 'काँग्रेस व्यवस्था' म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक वारसा, गांधी-नेहरू घराण्याची परंपरा, प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव, पक्षाचा सर्वसमावेशक सामाजिक आधार आणि सर्वसमावेशक धोरणांची आखणी यामुळे हा पक्ष प्रदीर्घ काळ भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिला. तथापि १९८९ नंतरच्या काळात या पक्षाचा प्रभाव ओसरलेला दिसून येतो. या बाबतचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**संदर्भ संज्ञा :** सनदशीर, काँग्रेस व्यवस्था, आणीबाणी, लोकानुरंजनवाद, हिंदुत्व, लोहियावाद




## ❖ प्रस्तावना :

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सत्तेविरुध्द सनदशीर मार्गाने लढा देणारी संघटना म्हणून १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळ व आंदोलनकारी संघटनेचे परिवर्तन राजकीय पक्षात झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात भिन्न मतमतांतरांना व विचारप्रवाहांना सामावून घेणारे तिचे स्वरूप आजही आहे. तसेच तो आजही एक पक्ष असण्याऐवजी अनेक उपपक्षांची संयुक्त आघाडी असल्याचे प्रतिपादन प्रा.भा.ल.भोळे करतात.[१] भारतीय राजकारणाचा मागोवा घेत असताना काँग्रेस पक्षाची चर्चा करणे अपरिहार्य बनते. लोकसभा निवडणुकांमधील कामगिरीचा आढावा घेत असताना या पक्षाच्या यशापयशाचीही चर्चा घडून येते. याबाबतचे विश्लेषण येथे करण्यात आले आहे.

## ❖ काँग्रेस व्यवस्थेचा काळ :

भारतीय राजकारणाच्या नेहरू कालखंडात हा पक्ष वर्चस्वस्थानी होता. भारतात १९५२ मध्ये लोकसेभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका (घटनात्मक) पार पडल्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेच्या ३६३ जागा मिळाल्या. दुसऱ्या क्रमांकावर कम्युनिस्ट पक्षाने केवळ १६ जागांवर विजय संपादन केला. या पक्षाला मिळालेल्या मतांची टक्केवारी अत्यल्प म्हणजे ३.३% इतकी होती. निवडणुकांच्या या पहिल्या टप्प्यावर काँग्रेसला शह देणारा सक्षम पर्याय अद्याप उदयास आला नव्हता.[२]

१९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका पंतप्रधान नेहरू यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या. गतवेळच्या तुलनेत यावेळी काँग्रेसची मते वाढली. लोकसभेच्या ३७१ जागा (४७.७८%) काँग्रेसला मिळाल्या.[३] दरम्यानच्या काळात कम्युनिस्ट व समाजवादी पक्षाला स्वत:ची संघटनात्मक उभारणी करण्यात काहीसे यश मिळाले. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या जागा १६ वरून २७ वाढल्या. याच काळात विविध राज्यांमध्ये झारखंड दल, शेकाप, छोटा नागपूर पार्टीसारखे प्रादेशिक पक्षही काँग्रेसला शह देण्यासाठी उदयास आले. असे असले तरी भरतीय राजकारणतील हा काळ 'काँग्रेस व्यवस्था' म्हणून ओळखला जातो. असा निष्कर्ष प्रा.पळशीकर यांनी काढला आहे.[४] १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक

निवडणुकीत काँग्रेसची विजयी परंपरा कायम राहिली. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेच्या ३६१ जागा (४४.७२%) मिळाल्या. राजकीय विश्लेषकांच्या मते, १९५२ ते ६२ या काळातील राजकीय स्पर्धा एकांगी राहिली. याचं एक कारण काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीमध्ये होत. इतर पक्षांपाशी सुसज्ज यंत्रणा नव्हत्या अथवा तेथे नेहरूंसारख्या नेतृत्वाचा अभाव होता.

१९६४ मध्ये प.नेहरूंचे निधन झाल्यामुळे लाल बहादुर शास्त्री व त्यांचेनंतर श्रीमंती इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. हा कालखंड पक्षांतर्गत आव्हानाचा काळ होता. पक्षांतर्गत फाटाफुट होऊनदेखील इंदिरा गांधींचा प्रभाव वाढतच गेला.

### ❖ १९६७ नंतरच्या निवडणुकांचा काळ :

नेहरू-शास्त्रींच्या निधनानंतर काँग्रेस पक्षाची सूत्रे इंदिरा गांधीकडे आली. १९६७ च्या निवडणुका इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या. या निवडणुकीची तीन प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात. एक, काँग्रेसचे लोकसभेतील संख्याबळ घटले. दोन, नऊ घटकराज्यांमध्ये बिगर काँग्रेस सरकारे आली आणि तीन, पक्षांतर मतभेद उफाळून आले.

या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेली मतांची टक्केवारी ४५ वरून ४१ वर आली. तसेच लोकसभेच्या जागा ३६१ वरून २८३ जागांवर काँग्रेसला समाधान मानावे लागले. महत्त्वाचा बदल म्हणजे पश्चिम बंगाल, हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, तमिळनाडू (मद्रास), केरळ, पंजाब व मध्य प्रदेश या नऊ राज्यांमध्ये काँग्रेसला सत्ता गमवावी लागली.[५] इंदिरा गांधी यांनी पक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतरच्या काळात काँग्रेसचा प्रभाव ओसरत गेलेला दिसून येतो. काँग्रेस वर्चस्वाची व्यवस्था पुढच्या काळात क्षीण होऊन काँग्रेसला विविध पर्याय प्रादेशिक पक्षांच्या रूपाने पुढे येऊ लागले.

१९६७ ते १९८७ या काळात काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला तीन वेळा आव्हाने निर्माण झाली. १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडली. १९६७ नंतर नऊ राज्यांमध्ये बिगर काँग्रेसची सरकारे स्थापना झाली आणि तीसरी गोष्ट म्हणजे १९७५ मध्ये पुकारलेल्या अंतर्गत आणीबाणीमुळे १९७७ मध्ये काँग्रेसला पहिल्यांदाच सत्तेतून पायउतार व्हावं लागलं. केंद्रात काँग्रेस पहिल्यांदाच सत्ताभ्रष्ट झाल्याचा परिणाम असा झाला की देशात नवी पक्षपध्दती उदयास आली.

१९७१ च्या निवडणुकांचे विश्लेषण मॉरिस जोन्स वायनर आदि विचारवंतांनी प्रस्थापित काँग्रेस व्यवस्था आणि नवलोकानुरंजनवाद असे केले आहे. पुढच्या काळात या नवलोकानुरंजनवादाचे रूपांतर व्यक्तीपुजेत झाल्याचे मत प्रा.जयंत लेले यांनी नोंदविले आहे.[६] १९७१ च्या वेळी बांग्लादेश मुक्तीसाठी भारतीय सैन्याने केलेल्या विजयी हस्तक्षेपामुळे पक्षाची लोकप्रियता वाढली. १९६७ नंतर इंदिरा गांधी यांनी समाजवादी व कल्याणकारी अर्थव्यवस्थेला पूरक धोरणांची आखणी केली. २० कलमी कार्यक्रम राबवून गरीब, आम आदमीला आपलेसे करण्यात त्यांना यश आले. शिवाय कनिष्ठ वर्गीय, दलित, अल्पसंख्यांक आणि आदिवासी वर्गाला आकृष्ट करण्याचे कौशल्य इंदिरा गांधींनी साध्य केले. त्यांना मिळालेल्या अफाट लोकप्रियतेमुळे भारतीय राजकारणात नेतृत्वकेंद्री आणि व्यक्तिकेंद्रीत राजकारणाला चालना मिळाली. परिणामी १९७१ निवडणुकीत काँग्रेसला भरघोस यश संपादन करता आले. या निवडणुकीत लोकसभेतील काँग्रेसचे संख्याबळ २८३ च्या तुलनेत (१९६७) ३५२ झ ाले. आणि काँग्रेसच्या मतांची टक्केवारी वाढून ४३.६८% इतकी झाली.[७] यानंतरच्या काळात इंदिरा गांधी काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा बनल्या. गरिबी हटाव, बँक राष्ट्रीयकरणाचे धोरण, जमिनदारी पध्दतीबाबत घेतलेली भूमिका यामुळे त्या पुरोगामी शक्तींच्या प्रतीक बनल्या.

इंदिरा गांधींच्या व्यक्तिकेंद्री राजकारणाचा फायदा जसा काँग्रेसला झाला तसे त्याचे धक्केही काँग्रेसला सोसावे लागले. पक्षांतर्गत हुकुमशाहीला शह देण्यासाठी अनेक बुजुर्ग नेत्यांनी त्यांच्याविरूध्द बंड केले. शिवाय बिगर काँग्रेसवाद किंवा लोहियावादाचाही उदय याच काळात झाला. 'बिगर काँग्रेसवाद' हे लोहियावादाचे मुख्य सूत्र होते. काँग्रेस हा घराणेशाही, अधिकारशाहीवादी आणि भांडवलशाही पक्ष आहे. म्हणून काँग्रेसचा पाडाव हे मुख्य उद्दिष्ट्य ठेऊन विरोध पक्ष जनआंदोलने उभारू लागला. जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण क्रांती याचेच फलित होते. सत्तेचे केंद्रिकरण, महागाई, दुष्काळ, इंदिरा गांधी यांच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचे चिरंजीव संजय गांधी यांचा हस्तक्षेप व प्रभाव याचाही आधार संपूर्ण क्रांतीच्या देशव्यापी चळवळीला होता. अशा राजकीय तणाव व तीव्र विरोधी वातावरणामध्ये १२ जून, १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची १९७१ च्या खासदारकीची निवडणूक रद्दबादल ठरविली. इंदिरा गांधींच्या राजीनाम्यासाठी जयप्रकाश नारायण यांनी संसदेला घेराव घालण्याचा निर्णय जाहीर केला. या कोंडीवर मात करण्यासाठी इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ मध्ये अंतर्गत आणीबाणी जाहीर केली.[८] मात्र या निर्णयाचे दीर्घकालीन परिणाम काँग्रेस पक्षाला सोसावे लागले. काँग्रेसने आणीबाणी लादून लोकशाहीचा गळा घोटला या रोषाला पुढच्या काळात सतत सामोरे जावे लागत आहे. या आणीबाणीचा मोठा धक्का म्हणजे काँग्रेसला पहिल्यांदाच राष्ट्रीय राजकारणातून पदभ्रष्ट व्हावे लागले. १९७७च्या निवडणुकीत बहुतेक काँग्रेस विरोधकांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. या पक्षाला लोकसभेच्या २९५ जागा आणि काँग्रेसला केवळ १५४ जागा मिळाल्या. जनता पक्षाच्या रूपाने केंद्रिय सत्तेत पहिले आघाडी सरकार (बिगर काँग्रेस) स्थानापन्न झाले. त्यामुळे प्रबळ एक पक्ष पध्दतीचा ऱ्हास होऊन बहुपक्षपध्दतीकडे भारतीय राजकारणाची वाटचाल सुरू झाली. हे चित्र १९६७ नंतर प्रादेशिक पातळीवर आणि १९७७ नंतर राष्ट्रीय राजकारणात निर्माण झाले.

जनता पक्षाच्या सरकारमध्ये अंतर्विरोध होता. वैचारिक संघर्ष बाजुला ठेऊन 'काँग्रेसला विरोध' या समान सूत्राने एकत्र आलेले हे तडजोडीचे सरकार होते. त्यामुळे जनता सरकार अल्पजीवी ठरले. या पार्श्वभूमीवर १९८० मध्ये मध्यावधी निवडणुका होऊन सातवी लोकसभा अस्तित्वात आली. त्यात काँग्रेस पक्षात फुट पडूनही (१९७८) काँग्रेस(आय) पक्षाला ३५३ जागा मिळाला. या रूपाने इंदिरा गांधी आणि काँग्रेस पक्षाचे भारतीय राजकारणात पुनरागमन झाले. यानंतरच्या काळात इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन ब्ल्यू स्टारची योजना यशस्वी केली. परंतु या घटनेमुळे भारतीय राजकारणाला कलाटणी मिळाली.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी शीख अंगरक्षकांनी इंदिरा गांधी यांची हत्या केली. या पार्श्वभूमीवर १९८४च्या निवडणुका झाल्या. इंदिरा गांधींच्या सहानुभूतीचा फायदा काँग्रेस पक्षाला झाला. यावेळी काँग्रेसला लोकसभेच्या ४०४ जागांवर मोठे यश प्राप्त झाले. भाजपला आंध्र आणि गुजरातमधील प्रत्येकी एक अशा दोन जागांवर यश मिळाले.[९] भारतीय राजकारणातील भाजपचा हा चंचू प्रवेश मानला जातो. या निवडणुकांपासून 'हिंदुत्व' या घटकाचा निवडणुक राजकारणात शिरकाव झाला. परिणामी 'हिंदू प्रतिक्रिये'चा वापर करून घेऊन मुस्लिम अनुनयाचे धोरण काँग्रेसने स्वीकारले. तर कधी हिंदू वोट बँकेला खूष करण्याचा प्रयत्न केला.[१०] मात्र या धोरणाचा फायदा काँग्रेसपेक्षा भाजपला अधिक झाल्याचे निवडणुकांवरून स्पष्ट झाले.

## ❖ १९८९ नंतरची काँग्रेसची कामगिरी :

१९८४ मध्ये सहानुभूतीच्या लाटेवर काँग्रेसला मिळालेले यश पाच वर्षांच्या काळात ओसरले. व्ही.पी. सिंग यांच्या रूपाने काँग्रेस पक्षात फूट पडली आणि जनता दलाचा उदय झाला. बोफोर्स घोटाळ्यामुळे 'मिस्टर क्लिन'ची प्रतिमा असणाऱ्या राजीव गांधी यांच्यावर आरोपांचा भडीमार सुरू झाला. या आधीच्या निवडणुकीत काँग्रेसने दिलेल्या आश्वासनांची पूर्ती झाली नाही. हिंदुत्वाच्या आधारे गुजरात व उत्तरेकडील राज्यात भाजपची लोकप्रियता वाढत गेली. परिणामी या निवडणुकीत काँग्रेसला १९५ जागांवर समाधान मानावे लागले. दिल्ली, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान या चार उत्तरेकडील राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपचा उदय झाला. भाजपला २ वरून ८६ जागा (११.५% मते) मिळाल्या. परिणामी काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून भाजपकडे पाहण्यात येऊ लागले.[११]

१९८९ नंतर भारतातील पक्षीय स्पर्धा द्विध्रुवीय अवस्था आणि त्रिध्रुवीय अवस्था अशी दोलायमान स्वरूपाची राहिली. यातूनच १९८९ व १९९६-९८ मध्ये तिसऱ्या आघाडीची कल्पना साकारली. मध्यंतरीच २१ मे १९९१ मध्ये प्रचाराच्या काळात राजीव गांधींची हत्या झाली. १९८९ ते ९१ या काळात व्ही. पी. सिंग व चंद्रशेखर यांची सरकारे अल्पजीवी ठरली. राजीव गांधी यांची हत्या होण्याआधी पहिल्या टप्प्यातील निवडणुका संपल्या होत्या. दुसऱ्या टप्प्यात गांधींच्या हत्येची सहानुभूती काँग्रेस पक्षाला मिळाली. काँग्रेसला लोकसभेच्या २३२ जागा मिळाल्या. भाजपला सोमनाथ ते अयोध्या रथयात्रेचा फायदा झाला. या पक्षाचे लोकसभेतील संख्याबळ ८२ वरून १२० झाले.[१२] तरीही झारखंड मुक्ती मोर्चाच्या पाठिंब्यावर पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार स्थापन झाले. मका अर्थात हे आघाडीचे सरकार होते.

आर्थिक सरकार निर्माण करण्याबरोबरच पंजाब, काश्मीरमधील अतिरेकी कारवायांवर अंकुश ठेवण्यावर राव सरकारला काहीसे यश मिळाले. तथापि, साखर, युरिया, सेंट किट्स, हवाला घोटाळा या प्रकरणामुळे या सरकारची प्रतिमा डागाळलेली होती. त्यातच १९९५ मध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात या राज्यांमध्ये भाजपची सरशी झाली होती. खुल्या व्यापारी धोरणामुळेही काँग्रेसला जनरोषाला सामोरे जावे लागले. काँग्रेस अंतर्गत मतभेद (केसरी-तिवारी-अर्जूनसिंग) निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर झालेल्या १९९६ च्या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या केवळ १४० जागा राखण्यात यश आले. १६१ जागा घेऊन भाजप लोकसभेतील सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून उदयास आला.[१३] तरीही भाजपला लोकसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकण्यात यश आले नाही. परिणामी भाजपचे १३ दिवसांचे व त्यानंतर देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल सरकार स्थापन झाले. परंतु ही सरकारे अल्पजीवी ठरली.

दरम्यानच्या काळात संघटनात्मकदृष्ट्या दुबळ्या बनलेल्या काँग्रेसमध्ये सोनिया गांधींच्या रूपाने नेतृत्व पुढे आले. त्यामुळे काही प्रमाणात पक्षाला उभारी मिळाली असली तरी भाजपने त्यांच्या विदेशी जन्माचा मुद्दा प्रभावीपणे पुढे आणला. सोनिया गांधी विरूध्द वाजपेयी अशी नेतृत्वाची स्पर्धा उभा करून भाजपने विविध राज्यांमध्ये व्यवहार्य आघाड्या साकारण्यात यश मिळविले. परिणामी १९९८ च्या निवडणुकीचा निकाल भाजपच्या बाजुने लागला. १९९६च्या निवडणुकीच्या तुलनेत १९९८ मध्ये भाजपला १६१ वरून १७९ जागा (२५.६%) मिळविण्यात यश आले. काँग्रेसला मात्र १४१ जागांवर (२५.८%) समाधान मानावे लागले.[१४]

१९९६ पासून लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला सतत अपयश आलेले दिसून येते. १९९८ व १९९९ च्या निवडणुकीत काँग्रेसला अनुक्रमे १४१ व ११४ जागा मिळाल्या. या निवडणुकांमध्ये उत्तर भारतात काँग्रेसचे संख्याबळ कमालीचे घटले होते. १९९६-९८ हा डाव्यांच्या राजकीय शक्तींचा शेवटचा व भाजपच्या उदयाचा कालखंड ठरला. १९८९ ते ९१ आणि १९९६-९८ या काळात डाव्या (वामपंथी) पक्षांना काँग्रेस, भाजपविरोधी आघाडी स्थापन करण्याची संधी मिळाली होती. जमानवादविरोधी, धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी, विकेंद्रित लोकाभिमुख आणि सामाजिक न्यायाच्या मुद्यावर काँग्रेस व भाजपविरोधी शक्तींनी एकत्र आणून किमान समान कार्यक्रमाच्या आधारे त्यांची मोट बांधण्यात डाव्यांना

अपयश आले. या परिस्थितीचा फायदा हिंदुत्ववादी राजकारण करणाऱ्या भाजपला झाला. त्यात काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीची भर पडली. ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेस, पवार-संगमा-अन्वर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, जी.के.मुपनार यांनी तमीळ मनिला काँग्रेस (१९९६) स्थापन केल्यामुळे काँग्रेसची तीन राज्यांमधील शक्ती क्षीण झाली होती. या सर्वांचा प्रतिकूल परिणाम काँग्रेसच्या वाटचालीवर झालेला दिसून येतो. ही परिस्थिती भाजपच्या वाढीस अनुकूल ठरली.

१९९९ ते २००४ या काळात भाजपचे सरकार होते. सोनिया गांधी यांनी विरोधी पक्षनेत्याची भूमिका प्रभावीपणे बजावली. या काळात इंडिया शायनिंग या घोषणेतील फोलपणा भाजपच्या अंगलट आला. तोपर्यंत महाराष्ट्र, कर्नाटकसारख्या राज्यातील काँग्रेस सरकारे पर्नप्रस्थापित झ ाली होती. परिणामी २००४ च्या निवडणुकीत लोकसभेच्या १४५ जागा मिळवून काँग्रेस काहींशी सावरली. इंदिरा गांधींनंतर काँग्रेस पक्षावर मजबूत पकड निर्माण करण्यात सोनिया गांधी यांना यश आले होते. १९८९ नंतरच्या काळात काँग्रेसच्या रूपाने मिळालेले स्थिर सरकार, गांधी-नेहरू घराण्याचे नेतृत्व, शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी या काँग्रेसप्रणित डॉ.मनमोहन सिंग सरकारच्या जमेच्या बाजू होत्या. त्यामुळे २००९च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे लोकसभेतील संख्याबळ वाढले. काँग्रेसला २००६ जागा (२८.५५%) मिळाली.[१५]

## ❖ २०१४ च्या निवडणुकीतील पराभव

२००४ ते २०१४ या कालावधीत सलग दोन टर्म काँग्रेसची सरकारे आली. काँग्रेसच्यादृष्टीने पहिली टर्म यशस्वी ठरली असली तरी दुऱ्या टर्ममध्ये काँग्रेसची कामगिरी निराशाजनक राहिली. २००९ नंतर आलेल्या डॉ.मनमोहन सिंग सरकारच्या काळात घोटाळ्यांची मालिका सुरू झाली. कोळसा घोटाळा, ऑलिम्पियाड घोटाळा यासारखी प्रकरणे प्रखरपणे मांडण्यात विरोधकांना यश आले. शिवाय सोनिया गांधींचे जावई रॉबर्ट वढेरा, काँग्रेस नेते चिदंबरम यांची चौकशी यामुळे काँग्रेसची प्रतिमा डागाळली. ॲन्टी इन्कबन्सीचीही या निवडणुकीला पार्श्वभूमी राहिली. त्यातच २००९ नंतर भाजपने गुजरातचे नरेंद्र मोदींना भावी पंतप्रधान म्हणून प्रोजेक्ट केले. त्यासंबंधीचा प्रचार भाजपने सोशल मीडियाद्वारे प्रभावीपणे केला. आणि तो काही प्रमाणात मतदारांच्या पसंतीसही पडला. या सर्वांचा एकत्रित परिणाम २०१४ च्या १६ व्या लोकसभा निवडणुकांवर झाला. अनेक राज्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेससारख्या प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसची साथ सोडली होती. त्यामुळे बहुसंख्य ठिकाणी काँग्रेसला एकाकी लढत द्यावी लागली. परिणामी ४६४ जागा लढविणाऱ्या काँग्रेसला लोकसभेच्या केवळ ४४ जागा राखता आल्या. या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या मतांची टक्केवारी घटून १९.५२% झाली. तर भाजपने ४२८ जागा लढवून २८२ जागा मिळवून लोकसभेत स्पष्ट बहुमत संपादन केले.[१६] या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या १/१० जागा न मिळाल्यामुळे विरोधी पक्षनेते पदावर बसण्याची संधी देखील मिळाली नाही. १९५२ ते ६७ या कालावधीत लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता. ही स्थिती २०१४ च्या १६ व्या लोकसभेलाही लागू झाली आहे.

## ❖ समारोप :

१९५२ ते ६७ या काळात राष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप 'काँग्रेस व्यवस्था' असे राहिले. १९६७ नंतरच्या काळात काँग्रेसला पर्याय देणारे प्रादेशिक नेतृत्व व अस्मितांवर आधारलेला पक्ष विविध घटकराज्यांमध्ये अस्तित्वात आले. हेच पक्ष सद्यकालीन राजकारणात 'काँग्रेस नको' म्हणून पर्याय शोधताना दिसतात. काही काळ त्यांनी जनता दलाला तर कधी भाजपला साथ देऊन काँग्रेसला शह दिला. अर्थात त्यांच्या अस्तित्वासाठी या पक्षांनी ही आखलेली रणनीति होती. त्यासाठी या पक्षांनी परस्परांमध्ये व्यवहार्य तडजोडीदेखील केल्या आहेत. त्याचा फटका काँग्रेसला आणि फायदा भाजपला झाला आहे. व्यापक सार्वजनिक हिताला दुय्यम स्थान देऊन पक्षीय स्वार्थ आणि अभिनिवेशाची किनार या राजकारणाला असल्याचे दिसून येते. यावर उपाययोजना शोधून काढण्यासाठी काँग्रेसला सैध्दांतिक व व्यावहारिक पातळीवर बदल घडवून आणावे लागतील. पक्षीय संघटन मजबूत करण्याबरोबरच गमावलेला सामाजिक जनाधार पुन्हा मिळविण्यासाठी व्युहरचना आखणे आवश्यक आहे. विविध राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांना विश्वासात घेऊन त्यांच्या आघाड्या निर्माण करण्याचा एक पर्याय काँग्रेसपुढे आहे. तरच 'काँग्रेसमुक्त भारत' या भाजपच्या घोक्षणेला शह बसेल.

## ❖ संदर्भ ग्रंथ :

१. भोळे भास्कर - २००३, *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण*, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ.१५
२. पळशीकर सुहास - २०१३, *राजकारणाचा ताळेबंद-भारतीय लोकशाहीची वाटचाल*, साधना प्रकाशन, पुणे, पृ.८९
३. पवार प्रकाश - २०१६, *काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय*, डायमंड प्रकाशन, पुणे, पृ. २०४
४. पळशीकर सुहास - उनि, पृ.८९
५. पळशीकर सुहास - उनि, पृ. १०४
६. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - २०१०, *भारतीय लोकशाही : अर्थ आणि व्यवहार*, डायमंड प्रकाशन, पुणे, पृ. १८१

७. पवार प्रकाश - उनि, पृ.२०४
८. पळशीकर सुहास - उनि, पृ. ५२-५३
९. *General Election*, १९८०, https://eci.gov.in
१०. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - उनि, पृ. २९२
११. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - उनि, पृ. २९४
१२. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - उनि, पृ. २९६
१३. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - उनि, पृ. २९९
१४. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, लेले चित्रा(अनु.) - उनि, पृ. ३००
१५. *General Election*, २००९, https://eci.gov.in
१६. *General Election*, २०१४, https://eci.gov.in